# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ११.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १०/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १११ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४७,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१०/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ७७.०३ लिटर दारू एकुण १३,९८०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.१०/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ८४०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.१०/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**एन डी पी एस ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. १०/१२/२०२२ रोजी फिर्यादी राजेश हनमनलु मलपिलु वय ३७ वर्ष व्य.नौकरी सपोनि दहशतवाद विरोधी पथक हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा नागनाथ येथे कलम २० (अ) एन.डी.पी.एस. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने सामाईक वहितीच्या कबजा असलेलया शेतातील तुरीच्या व हाळदीच्या उभ्या पिकामध्ये ओळीने स्वता:चे फायद्यासाठी विना परवाना बेकायदेशीर रित्या गांजाची झाडे लावुन त्याची जोपासना व संवर्धनक करतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा. दाखल असुन आरोपीकडुन एकुन ३५,७००/— रू च्या किंमतीची गांज्याची झाडे जप्त करण्यात आली असुन पुढील तपास औंढा ना.पोलीस करित आहेत.

**प्राण्याची छळ प्रतिबंधक अधिनियम व सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. १०/१२/२०२२ रोजी फिर्यादी बाबासाहेब शिवाजी खार्डे वय ४०वर्ष व्य.नौकरी पोउपनि ने. पोस्टे वसमत शहर यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ३०७, ३५३, ३७९, २७९,३३२,३३७,४२०,४२७,३४ भादवी सह कलम ४/२५ भा.ह.का.११(१)(डी), ११(१)(ई),

११(१)(एफ),११(१)(क) प्राण्याची छळ प्रतिबंधकर अधी. सह कलम १३४, १८४,२३९/ १७७,१७९/१७७ मोवाका अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व स्टॉफवर शासकीय काम करीत असतांना प्राणघातक हल्ला करून जनावरे चोरी करून भरधाव वेगाने वहान चालवुन दगडाने हल्ला करून जख्मी करून सरकारी वाहनाचे नुकसान करून वाहनाचा डुप्लीकेट नंबर प्लेट तयार करून घातक शस्त्रास्त्रे बाळगुन अपघात झाल्याची पोलीसांना माहिती न देता पळुन घेवुन जावुन मुक्या प्राण्याचा छळ करून धोकादायक रित्या वाहन चालवले म्हणुन गुन्हा दाखल असुन पुढील तपास वसमत शहर पोलीस करित आहेत.